२५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क.रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.११/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०६ जुलै, २०२२.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
( मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार,
अकोला, वाशिम, नागपूर, भंडारा व गोंदिया वगळून)

विषय :- २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

संदर्भ :- १) मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र. १९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि. .०३/०३/२०२२, दि.०४/०५/२०२२ व दि. १७/०५/२०२२ रोजी झालेला निर्णय

२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.१०/का.७, दि.१०/०५/२०२२

३) राज्य निवडणूक आयोगाची क्रमांक-रानिआ/ग्रापंनि/२०२०/प्र.क्र.०४/का.८, दि. २/०६/२०२२ रोजीची अधिसूचना

४) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.१० /का.७, दि. ०५/०७/२०२२

महोदय/महोदया,

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भाकित अ.क्र.१ च्या निर्णयानुसार २५ जिल्हा परिषदा व २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी संदर्भाकित अ.क्र. २ च्या आदेशान्वये अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली असून अ.क्र. ३ च्या आदेशान्वये आरक्षण निश्चितीचा कार्यक्रम देण्यात आला आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने ३ टप्पे असतात :-

(i) प्रभाग रचना व आरक्षण ठरविणे.

(ii) भारत निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय तयार केलेल्या मतदार यादीचे Cut-off-date रोजी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन
(iii) प्रत्यक्ष निवडणूक

३. मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका विहित वेळेत पार पाडण्यासाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

४. जुलै ते ऑक्टोबर,२०२२ मध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन अधिसूचनेन्वये दि. ३१/०५/२०२२ ही Cut-off-date जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि. ३१/०५/२०२२) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरण्यात येईल.

५. २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा परिषद निवडणूक विभागनिहाय व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय मतदार यादी तयार करण्यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

६. मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती - दि.०१/०१/२०२२ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दि. ३१/०५/२०२२ पर्यंत अद्यावत केलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोगाने दि. ०२/०६/२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये दि.३१/०५/२०२२ हा दिनांक Cut off Date जाहीर केला असून त्यादिवशी (म्हणजेच दिनांक ३१/०५/२०२२ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

उपरोक्त निवडणुकांकरिता भारत निवडणूक आयोगाने दि. ३१/०५/२०२२ पर्यंत प्रसिध्द केलेल्या मतदार यादीच्या आधारे प्रारुप प्रभाग रचनेनुसार मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही करावी.

७. वरील मतदार यादी ग्राहय धरुन २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांमधील अनुक्रमे परिशिष्ट २ मध्ये नमूद सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट १ प्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दिनांक १८/०७/२०२२ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दिनांक १८/०७/२०२२ ते २२/०७/२०२२ |
| (iii) | प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : | दिनांक २९/०७/२०२२ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दिनांक ०८/०८/२०२२ |

**८. प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

८.१ जिल्हाधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालीलप्रमाणे प्रभागनिहाय विभाजन करावे.

(i) आयोगाकडून युजरआयडी व पासवर्ड प्राप्त करुन Assembly Master, Ward Master इ. अपलोड करणे.

(ii) कंट्रोल चार्ट योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून मतदार यादीची पीडीएफ तयार करणे.

८.२ प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी :-

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित निवडणूक विभाग व निर्वाचक गण क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि संबंधित निवडणूक विभाग व निर्वाचक गणासाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे, याची खातरजमा करण्यात यावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ मनपा-२००७/प्र.क्र.०६/ का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावासमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का.५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्यांमधील दुरुस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/ प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

इ) महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

८.३ महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

**९. प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार / नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दि.१८/०७/२०२२ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. (परिच्छेद १२ प्रमाणे)

**१०. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

१०.१ दि. १८/०७/२०२२ ते दि.२२/०७/२०२२ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांनुसार फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल :-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, पंचायत समितींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

१०.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा करुन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करण्यात याव्यात.

११. अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना दि.०८/०८/२०२२ रोजी मुद्दा क्र. १२ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

१२. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील सूचना फलक

(ब) स्थानिक वृत्तपत्र

(क) स्थानिक केबल टि.व्ही.

(ड) जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयातील संकेत स्थळ, इत्यादी.

**१३.** राज्यात उद्भवलेल्या कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर प्रत्येक मतदान केंद्रात ८०० ते ९०० मतदार जोडण्यात यावेत. तथापि, मतदार यादीची विभागणी करतांना निवडणूक विभाग व निर्वाचक गणातील उर्वरित मतदार हे किमान अगर कमाल पेक्षा कमी किंवा अधिक (१०% पर्यंत) असतील तर त्यासाठी वेगळयाने मतदान केंद्र करण्याची आवश्यकता नाही.

१४. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची राहील.

१५. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीबाबत न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यास मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

१६. केंद्र व राज्य शासनाकडून कोविड-१९ च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दक्षता घेण्याबाबतच्या सूचना/निर्बंध लागू झाल्यास राज्य निवडणूक आयोगाने

क्र. रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.०१/का.०७, दि.१७ जानेवारी,२०२२ च्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

१७. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबाजवणीसंदर्भात आयोगाच्या नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या संगणकीकरण कक्षामधील खालील दुरध्वनी किंवा ई-मेलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

**दूरध्वनी क्रमांक -०२२-२२८८६९५०/२२०२२९०९**

Email - sec.mh@gov.in

१८. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत-परिशिष्ट-१ व २

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई. यांना कळविण्यात येते की, सार्वत्रिक निवडणूकांकरीता मतदार यादी तयार करण्यासाठी लागणाऱ्या अनुदानाचे वाटप करण्यात यावे.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व-२५)
६. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
७. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

## परिशिष्ट-१

## २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक | ३१ मे,२०२२ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार केलेली मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | १८ जुलै,२०२२ |
| ३ | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | २२ जुलै,२०२२ |
| ४ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १३ खाली अधिप्रमाणित करण्याची तारीख | २९ जुलै,२०२२ |
| ५ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या छापील मतदार याद्या माहितीसाठी ठेवण्यात आल्या आहेत, याबाबतची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | २९ जुलै,२०२२ |
| ६ | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०८ ऑगस्ट,२०२२ |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषद | पंचायत समित्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | रायगड | पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड, रोहा, तळा, माणगाव, म्हसाळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर |
| २ | रत्नागिरी | मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर |
| ३ | सिंधुदुर्ग | वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग |
| ४ | नाशिक | बागलाण, मालेगाव, देवळा, कळवण, सुरगणा, पेठ, दिंडोरी, चांदवड, नांदगाव, येवला, निफाड, नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपूरी, सिन्नर |
| ५ | जळगाव | चोपडा, यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड, भुसावळ, जळगांव, धरणगांव, अंमळनेर, पारोळा, एरंडोल, जामनेर, पाचोरा, भडगांव, चाळीसगाव |
| ६ | अहमदनगर | अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, पाथर्डी, अहमदनगर, राहुरी, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड |
| ७ | पुणे | जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हा, भोर, बारामती, इंदापूर |
| ८ | सातारा | खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड |
| ९ | सांगली | आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठे महांकाळ, पलुस, वाळवा-इस्लामपूर, शिराळा, मिरज |
| १० | सोलापूर | करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर,माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट |
| ११ | कोल्हापूर | शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड |
| १२ | औरंगाबाद | सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, औरंगाबाद, पैठण |
| १३ | जालना | भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, जालना, मंठा, परतूर, घनसावंगी, अंबड |
| १४ | परभणी | जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड |
| १५ | हिंगोली | हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ, वसमत |
| १६ | बीड | गेवराई, माजलगाव, वडवणी, बीड, शिरुर (कासार), पाटोदा, आष्टी, केज, धारूर, परळी, आंबेजोगाई |

| अ.क्र. | जिल्हा परिषद | पंचायत समित्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १७ | नांदेड | माहूर, किनवट, हिमायतनगर, हदगाव, अर्धापूर, नांदेड, मुदखेड, भोकर, उमरी, धर्माबाद, बिलोली, नायगांव (खै.), लोहा, कंधार, मुखेड, देगलूर |
| १८ | उस्मानाबाद | परांडा, भूम, वाशी, कळंब,उस्मानाबाद, तुळजापूर, लोहारा,उमरगा |
| १९ | लातूर | अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा |
| २० | अमरावती | चिखलदरा, चांदूरबाजार, मोर्शी, वरुड, अमरावती, अचलपूर, अंजनगावसुर्जी, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, भातकुली, धारणी |
| २१ | बुलढाणा | जळगाव-जामोद, संग्रामपूर, शेगाव, नांदुरा, मलकापूर, मोताळा, खामगाव, मेहेकर, चिखली, बुलढाणा, देऊळगावराजा, सिंदखेडराजा, लोणार |
| २२ | यवतमाळ | उमरखेड, महागाव, पुसद, दिग्रस, आर्णी, दारव्हा, नेर, यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, राळेगाव, मारेगाव, वणी, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी |
| २३ | वर्धा | आष्टी, कारंजा, आर्वी, सेलू, वर्धा, समुद्रपूर, देवळी, हिंगणघाट |
| २४ | चंद्रपूर | चिमूर, नागभीड, ब्रम्हपुरी, सिंदेवाही, भद्रावती, वरोरा, चंद्रपूर, मूल, सावली, पोभुंर्णा, गोंडपिंपरी, बल्लारपूर, कोरपणा, जिवती, राजुरा |
| २५ | गडचिरोली | कोरची, कुरखेडा, देसाईगंज, आरमोरी, धानोरा, गडचिरोली, चामोर्शी, मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी, सिरोंचा |

RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ८, अंक ३५] गुरुवार, जून २, २०२२/ज्येष्ठ १२, शके १९४४ [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जून २०२२

**माहे जुलै, २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकांसाठी दिनांक ३१ मे २०२२ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी गाह्य धरण्याबाबत.**

**आदेश**

क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०४/का-८.- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९(१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९)मधील कलम ७ (अ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ चे पोट-कलम(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, दिनांक ३१ मे २०२२ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी माहे जुलै, २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/ पोट-निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**किरण कुरुंदकर,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.